# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** इचलकरंजी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0333 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/08/2025 21:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 21/08/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/08/2025
   **Time From (वेळेपासून):** 13:32 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/08/2025 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/08/2025 20:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** 5 उपविभागीय पोलीस अधिकारी , 5 कार्यालय, इचलकरंजी विभाग इच,इचलकरंजी येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैष्णवी सुरेश पाटील पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,इचलकरंजी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,इचलकरंजी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9764140777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अल्ताफ हारून सय्यद हारून सय्यद | | | 1. पोहेकबनं 871, स्मशानभुमी समोर, शहापुर,इचलकरंजी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | पवनकुमार अशोक उपाध्ये | | | 1. खाजगी वकील,दिपश्रेय, महालक्ष्मी व्हिलेज, साळुंखे मळा, इचलकरंजी,इचलकरंजी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):



Scanned with CamScanner

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 21/08/2025

मी वैष्णवी सुरेश पाटील वय 44 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 9764140777 समक्ष इचलकरंजी पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

मी दिनांक 23/04/2025 सायंकाळी 5.30 वा चे सुमारास रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे कार्यालयात हजर असताना मला जितेंद्र गोविंद कारखानिस वय 49 वर्षे, व्यवसाय- व्यापार रा.17/90 विवेकानंद कॉलनी, गोकुलधाम अपार्टमेंट, दुसरा मजला, लायकर टॉकीज जवळ, इचलकरंजी ता.हातकणंगले जि. कोल्हापूर मो. नं. 8830507063 यांनी समक्ष भेटुन त्यांनी त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, माझा श्री रिध्दी आराध्या एंटरप्राईजेस या नावाने व पत्नी सौ. रूपाली जितेंद्र कारखानीस यांचा रूद्र एंटरप्राईजेस या नावाने इचलकरंजी येथे जळावू लाकूड विक्रीचा व्यवसाय आहे. सदर दोन्ही फर्मचा व्यवसाय मी स्वतः पहात असतो. आमचे फर्ममध्ये व श्री जयलक्ष्मी एंटर्रपाईजेसचे मालक प्रताप विष्णु यादव व त्यांची पत्नी सौ. जया यादव यांचेमध्ये लाकूड खरेदी विक्रीचा व्यापार सुरू होता. तसेच प्रताप यादव हे कमिशन घेवून माझे फर्मचा माल दुस-या फर्मला विक्री करून मालाची रक्कम मला देत होते. गेले तीन वर्षापुर्वी प्रताप यादव व त्यांची पत्नी जया यादव यांनी आमचे फर्मकडून माल घेवून कमिशन बेसवर दुस-या फर्मला जळावु लाकुड विक्री केला होता. त्यावेळी त्यांनी माझे अपरोक्ष त्यांचे स्वतःचे फर्मची बिले समोरील फर्मच्या मालकांना देवून, त्यांचेकडून पैसे वसुल करून, ती रक्कम मला न देता माझी एकूण 25,51,740 रूपयांची फसवणूक केली असल्याने मी व पत्नी सौ. रूपाली कारखानीस असे आम्ही दोघांनी दि.31/07/2024 रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, ग्रामीण विभाग इचलकरंजी यांचे कार्यालयामध्ये तक्रारी अर्ज दिला होता. आम्ही दिलेल्या तक्रारी अर्जाचे चौकषी करीता मला व प्रताप यादव यांना डीवायएसपी ऑफिस इचलकरंजी येथे ऑगस्ट 2024 मध्ये बोलविण्यात आले होते. तेथे मी दिलेल्या अर्ज चौकशीचे काम तेथील पोलीस कर्मचारी अल्ताफ सय्यद हे करीत होते. त्यानी अर्जचौकशीमध्ये माझेत व प्रताप यादव यांचेत मध्यस्थी केली. त्यावेळी प्रताप यादव यांनी मला एकूण 17,50,000 रू.चे चेक देण्याचे मान्य केले होते. त्यानंतर मी वेळोवेळी अर्जाप्रमाणे कारवाई होवुन माझी रक्कम मला मिळावी म्हणुन पोलीस अल्ताफ सय्यद यांना भेटण्यास जात होतो. त्यावेळी सय्यद यांनी मला, तुम्हाला 17,50,000 रू.चेक मिळवून देणार आहे त्याचे 10 टक्के आंम्हाला दयायला पाहीजे असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना आर्थिक अडचणी मध्ये आहे काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला राऊंड फिगर 1,50,000/- रूपये दया असे म्हणाले. मी दि. 22/01/2025 रोजी अल्ताफ सय्यद यांना भेटलो त्यावेळी तेथे माझे व त्यांचे ओळखीचे वकील पवन उपाध्ये होते. त्यावेळी पोलीस सय्यद यांनी माझे अर्जाचा विषय त्यांना सांगितला. पोलीस सय्यद यांनी मला माझे कामाकरीता टोकण दयावे लागेल असे म्हणाले. त्यावेळी वकील उपाध्ये यांनी पोलीस सय्यद साहेब सांगतात त्याप्रमाणे त्यांना पैसे दया म्हणजे ते तुमचे काम करतील तसेच तुमचे कामाकरीता, मी ही पाठपुरावा करतो असे म्हणाले. पोलीस सय्यद यांनी मला वकील पवन कुमार उपाध्ये यांचे अकाउंटवर 40,000/- रूपये पाठविणेस सांगितले. त्यावेळी मी नाईलाजस्तव माझे गुगल पे वरून पवन कुमार उपाध्ये यांना दिनांक 22/01/2025 रोजी 40,000/- रूपये पाठविले. त्यानंतर वकील उपाध्ये यांनी सदरचे 40,000/- रूपये अल्ताफ सय्यद यांना दिले. त्यानंतर मी मार्च 2025 मध्ये अल्ताफ सय्यद यांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला प्रताप यादव यांनी चेक दिले असुन सदरचे चेक त्यांचेकडे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावेळी मी त्यांना प्रताप यादव यांनी दिलेले चेक देण्याची विनंती



Scanned with CamScanner

केली. परंतु अल्ताफ सय्यद यांनी ठरलेली संपुर्ण रक्कम दिल्या शिवाय चेक देणार नाही असे म्हणून उरलेले 1,10,000 रू.ची मागणी केली. सदरचे रक्कम वकील पवन उपाध्ये यांचेकडे देणेस सांगितली. त्यावेळी त्यांनी मला प्रताप यादव यांनी मला देणेसाठी दिलेले चेक दाखविले. त्या चेकवर दि.25/04/2025 अषी तारीख नमुद होती. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा करून 24/04/2025 रोजी भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो. पोलीस अल्ताफ सय्यद यांनी माझेकडे मागणी करत असलेले 1,10,000/- रूपये वकील पवन उपाध्ये यांचेकडे दया. असे म्हणुन लाच मागणी करीत असलेची व वकील उपाध्ये हे पोलीस अल्ताफ सय्यद हे माझेकडे मागणी करत असलेल्या लाच मागणीस सहाय्य करीत असल्याची माझी खात्री झाली आहे, तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी. अशी तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी तक्रारदार कारखानीस यांनी ते पोलीस अल्ताफ सय्यद यांना दि. 24/04/2025 रोजी दुपारी 01.00 वा चे सुमारास त्यांचे कार्यालयात भेटण्यास जाणार असलेचे सांगितल होते. त्यावेळी मी त्यांना त्यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करीता मी, पंच व माझे स्टाफसह दिनांक 24/04/2025 रोजी सकाळी 12.00 वा चे सुमारास कोडींग्रे फाटा ता. शिरोळ येथे हॉटेल भाग्यलक्ष्मी जवळ येत असुन, सदर ठिकाणी त्यांना येण्यास सांगितले होते.

दिनांक 24/04/2025 रोजी मी, सापळा पथकातील स्टाफ,शासकीय पंच असे कोल्हापूर ला.प्र.वि. कार्यालयातुन निघुन दुपारी 12.45 वाजता हॉटेल भाग्यलक्ष्मी जवळ आलो. त्यावेळी, हॉटेलच्या बाजुला मोकळया जागेत मला तक्रारदार कारखानीस भेटले. त्यावेळी मी त्यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार कारखानीस यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. कारखानीस यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. कारखानीस यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार कारखानीस व पंच नं.01 गरगटे यांचेसह डी.वाय.एस.पी ऑफीस इचलकरंजी येथे पाठवून कारखानीस यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे पोलीस सय्यद हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये केडीएम कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रादार कारखानीस व पंचाची खात्री करून दिली. तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर दुपारी 01.32 वाजता चालु करून, तो तक्रारदार कारखानीस यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन तक्रारदार कारखानीस व पंच नं.1 गरगटे यांना पोलीस सय्यद यांची भेट घेण्याकरीता, त्यांचे मोटर सायकल क्रमांक एम.एच.12.सी.पी.4561 वरून डीवायएसपी इचलकरंजी कार्यालयात पाठविले. तक्रारदार कारखानीस व पंच नं.1 गरगटे असे डीवायएसपी इचलकरंजी कार्यालयात जावुन पोलीस अल्ताफ सय्यद यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर दुपारी 02.29 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही पंच गरगटे यांना पोलीस सय्यद यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार कारखानीस यांचे सोबत डीवायएसपी कार्यालयात जावुन पोलीस सय्यद यांना भेटलो त्यावेळी सय्यद यांचेशी कारखानीस यांचे चेक देणेबाबत बोलने झाले, त्यांनी उपाध्येशी बोलल्यावर कारखानीस यांना चेक देतो असे सांगितले. तसेच उपाध्ये यांचेशी कारखानीस यांचे फोनवरून बोलने झाले तेंव्हा उपाध्ये वकील यांनी पोलीस सय्यद यांचेकडून तक्रारदार कारखानीस यांना चेक घेवून देतो, त्याकरीता पोलीस हवालदार सय्यद यांना तीन लाख रूपये दयावे लागतील असे म्हणुन तीन लाख रूपयांची मागणी केली तसेच वकील उपाध्ये यांनी तक्रारदार कारखानीस यांचेकडे मागणी केलेल्या लाच मागणीस, पोलीस सय्यद यांनी प्रोत्साहन देत आहेत म्हणुन वगैरे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार कारखानीस यांना तेथे काय झाले याबाबत विचारणा केली असता, कारखानीस यांनी सांगितले की, मी व पंच डीवायएसपी कार्यालयात जावुन पोलीस सय्यद यांना भेटलो त्यावेळी पोलीस सय्यद यांनी "या बसा व पंचाकडे इशारा करून, हे कोण ?" असे विचारले त्यावेळी मी "प्रोसेस मधला..." असे बोललो. त्यावेळी मी "काय नाही ते 25 तारीख उदया चेक देतो म्हणाला होता ना..." असे बोललो. त्यावर पोलीस सय्यद "हा हा 25 तारखेला..." असे बोलले. त्यानंतर आमचेत चेक देण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी पोलीस सय्यद "उपाध्ये साहेबांशी बोलुन घ्या मग हं..." असे म्हणाले. त्यावेळी मी "साहेबांना बोलवू आता इथं..." असे बोललो. त्यावर पोलीस सय्यद "उपाध्ये साहेबांना, त्यांचा फोन आलता मला काल..." असे बोलले. त्यावेळी मी माझे मोबाईलवरून ॲड.पवन उपाध्ये यांना फोन लावला त्यांना "सय्यद साहेबांच्या ऑफिसला आलोय इथं.." असे सांगितले. त्यावेळी उपाध्ये वकील यांनी "बर बर काय काय केलंईस."असे बोलले. त्यावेळी पोलीस सय्यद "या म्हणा इकडं." असे बोलले. त्यावेळी उपाध्ये वकीलांनी ते बाहेर आहेत, असे म्हणुन मला सय्यद साहेबांचे जवळुन बाजुला बाहेर येण्यास सांगितले. मी बाजुला आल्यानंतर उपाध्ये यांनी "बोल की काय काय



Scanned with CamScanner

केलाईस.." असे विचारले. त्यावेळी मी माझेत व पोलीस सय्यद यांचेत चेक चे अनुषंगाने झालेली चर्चा सांगितली. त्यावेळी उपाध्ये वकील "मला सांग कितीचं केलाईस तु..." असे बोलले. त्यावेळी मी "हे बघ आता आपलं दिडचं ठरलयं बरोबर हाय...दिड मधलं चाळीस पोचलयं..."असे बोललो. त्यावर उपाध्ये वकील "तीन...तीन...ठरलयं जितु." असे बोलले. त्यावेळी मी "किती..."? असे म्हणालो. त्यावेळी उपाध्ये वकील "तीन..." असे बोलले. त्यानंतर आमचेत पैशाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी त्यांनी मला संध्याकाळी भेट असे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा सय्यद साहेबांना भेटलो व उपाध्ये वकील बाहेर असेलबाबत त्यांना सांगितले.त्यावेळी पोलीस सय्यद यांनी उपाध्ये साहेबाषी बोलतो मी, हं.. असे म्हणाले. त्यावेळी मी "तीन.. तीनच करूया", "त्यात काय कॉप्रोमाईज करूया साहेब, पण काय आहे साहेब, येवढ आडचणीत आलोय की" असे म्हणालो. त्यावेळी पोलीस सय्यद यांनी " उपाध्ये साहेबाशी बोलून घ्या, तुम्ही माझ्या समोर विषय करू नका" असे म्हणाले. त्यावेळी मी "चेक उदया देणार ना मला" असे विचारले त्यावर पोलीस सय्यद यांनी "देतो की.." असे म्हणाले. त्यानंतर आमचेत पुन्हा चेक तसेच गैरअर्जदार यादव यांचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी " मी साठची व्यवस्था करून आलतो साठ आणि चाळीस, एक लाख पोचले असते" असे म्हणालो. त्यावर सय्यद यांनी"साहेबांना भेटा तुम्ही, उपाध्ये साहेबांना." असे म्हणाले. त्यानंतर आम्ही निघुन आल्याचे कारखानीस यांनी सांगितले.

तक्रारदार कारखानीस यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय इचलकरंजी येथे केलेल्या अर्जाचे चौकशीचे काम पोलीस कर्मचारी सय्यद यांचेकडे होते, त्यांनी अर्जातील चौकशीमध्ये गैरअर्जदार यादव व तक्रारदार कारखानीस यांचेत तडजोड करून, त्यांचेकडून तक्रारदार कारखानीस यांना देणेसाठी बँकेचे चेक घेवुन, त्यांनी ते स्वतःकडे ठेवून घेतलेले असल्याचे निष्पन्न झाले असुन, पोलीस सय्यद यांनी तक्रारदार कारखानीस यांना उपाध्ये साहेबांषी बोललो आहे, असे सांगून तक्रारदार कारखानीस यांना वकील उपाध्ये यांचेशी बोलण्यास सांगितले, तक्रारदार कारखानीस हे वकील उपाध्ये यांना फोन करून त्यांचेशी बोलले त्यावेळी उपाध्ये वकील हे पोलीस सय्यद यांचेकडून तक्रारदार कारखानीस यांना चेक घेवून देण्याकरीता, पोलीस सय्यद यांचेकरीता तीन लाख रूपये लाचेची मागणी करत असल्याचे व संध्याकाळी फोन कर, त्यानंतर संध्याकाळी चेक देण्याची हमी देत आहेत, यावरून पोलीस सय्यद यांना वकील उपाध्ये हे तक्रारदार कारखानीस यांचेकडुन लाच मिळवून देण्यासाठी सहाय करत असल्याचे तसेच कारखानीस यांनी सय्यद यांना "चेक उदया देणार ना मला" असे विचारले त्यावर पोलीस सय्यद यांनी "देतो की.." असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी " मी साठची व्यवस्था करून आलतो साठ आणि चाळीस, एक लाख पोचले असते" असे म्हणाले त्यावेळी सय्यद यांनी "साहेबांना भेटा तुम्ही, उपाध्ये साहेबांना." असे म्हणुन वकील उपाध्ये यांनी तक्रारदार कारखानीस यांचेकडे मागणी केलेल्या लाच मागणीस प्रोत्साहन देत असल्याचे दिनांक 24/04/2025 रोजीचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले. वकील उपाध्ये हे बाहेर असून त्यांनी तक्रारदार कारखानीस यांना संध्याकाळी फोन कर असे म्हणाले असल्याने, उपाध्ये वकील यांना फोन करून, त्यांना घेवून पोलीस सय्यद यांची समक्ष भेट घेवून, पैसे केव्हा द्यायचे याबाबत चर्चा करणेकरीता पाठविण्याचे सर्वानुमते ठरविले.

काहीवेळाने माझे सुचनेवरून तक्रारदार कारखानीस यांनी उपाध्ये वकील यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 8830507063 वरून उपाध्ये वकील यांचे मोबाईल क्रमांक 9822443117 वरती स्पिकर ऑन करून दुपारी 03.24 वाजता आमचे व पंचासमक्ष फोन केला त्यावेळी तक्रारदार कारखानीस यांनी उपाध्ये यांना " सय्यद साहेंबाना कवा भेटायच आपण" असे विचारले, त्यावेळी त्यांनी इस्लामपूरला आलो आहे असे सांगुन " आपण समक्ष भेटून बोलूया आणि मग सांगुया, पाच पर्यंत येतोय मी, आल्यावर रिंग करतो, तेज्याकडन रात्री दहा वाजूदे, चेक घेउन देतो, का काळजी करतोस" असे बोलून फोन दुपारी 03.25 वाजता बंद केला. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पंचासमक्ष रेकॉर्ड केला आहे. त्यानंतर आम्ही उपाध्ये वकील यांचे फोनची वाट पहात हॉटेल भाग्यलक्ष्मी चे बाजूचे आवारात थांबून राहीलो.

त्यानंतर माझे सुचनेवरून पुन्हा सायंकाळी 05.56 वा तक्रारदार कारखानीस यांनी उपाध्ये वकील यांना फोन लावला, त्यावेळी उपाध्ये वकील यांनी "मला सांग आता त्याला किती पेमेंट दयायच आपण..." असे विचारले. त्यावेळी तक्रारदार कारखानीस यांनी "कुणाला सय्यद साहेबाना..." असे विचारले. त्यावर उपाध्ये वकील "तिथं... तिथंच किती दयायच..." असे बोलले त्यावेळी तक्रारदार कारखानीस यांनी "आरे तु मला दीड प्रमाणे म्हणल्यावर, मी साठची व्यवस्था केलो होतो..." असे बोलले. त्यावर उपाध्ये वकील "नाय नाय खुळ्या, दीड नाही आईक" असे बोलले. त्यानंतर त्यांचेत पैशाचे व कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी उपाध्ये वकील "ऐक्च्युअली ते तीन लाख ठरलत..." असे बोलले त्यावेळी तक्रारदार कारखानीस हुं... असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत ते परत आलेनंतर साहेबांना जावुन भेटायचे या अनुषंगाने बोलने झाले. त्यानंतर फोन 05.57 वाजता बंद केला. त्यानंतर आम्ही बराच वेळ उपाध्ये वकील यांचे फोन ची वाट पाहत थांबलो परंतु त्यांचा फोन आला नाही. तसेच बराच वेळ झाल्याने



Scanned with CamScanner

डी.वाय.एस.पी ऑफीस येथील सय्यद साहेब हे ऑफीस मधून निघून गेले असतील, त्यामुळे त्यांची भेट होण्याची षक्यता नसल्याने तसेच उपाध्ये यांनी देखील फोन केलेला नसल्याने, आम्ही चालु कारवाई तात्पुरती स्थगित करून उपाध्ये वकील यांचा फोन आलेनंतर पुढील कारवाई करणेचे सर्वामते ठरले.

दिनांक 28/04/2025 रोजी तक्रारदार कारखानीस यांनी आम्हाला सांगितले की, दिनांक 28/04/2025 रोजी 11.08 वा चे सुमारास वकील पवन उपाध्ये यांनी त्यांचे गुगल पे वरती त्यांचेकडुन यापुर्वी पोलीस सय्यद यांना देणेसाठी घेतलेले 40,000/- रूपये परत केले. म्हणुन त्यांनी वकील उपाध्ये यांना फोन करून पैसे परत का पाठविलेस असे विचारले त्यावेळी त्याने "तु पोलीस सय्यद यांचेविरूध्द अँन्टी करप्शन कडे तक्रार केली आहेस तु पंच घेवुन त्यांना भेटायला गेला होतास आम्हाला सगळे लक्षात आले आहे" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार कारखानीस यांनी कोणाचीही तक्रार केली नसल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी आम्ही त्यांना पुन्हा उपाध्ये किंवा पोलीस सय्यद यांनी संपर्क केल्यास आम्हाला कळविणेबाबत सांगितले. दिनांक 30/04/2025 रोजी तक्रारदार कारखानीस यांनी आम्हाला सांगितले की, दिनांक 30/04/2025 रोजी ते घरी असताना वकील पवन उपाध्ये हे त्यांचे घरी आले व त्यांनी कारखानीस यांना पोलीस सय्यद यांच्याकडे असलेले कारखानीस यांना देणेकरीता यादव यांनी दिलेले पाच लाखाचे तिन चेक दिले. त्यावेळी तक्रारदार कारखानीस यांनी उपाध्ये यांना " कसे काय सय्यद साहेबांनी चेक दिले" असे विचारले, त्यावेळी त्यांनी तु पोलीस सय्यद यांची तक्रार केली आहेस. हे चेक घे आणि तक्रार मागे घे, असे म्हणुन घरातुन निघुन गेले. अशी हकीकत सांगितली. दिनांक 04/06/2025 रोजी तक्रारदार कारखानीस यांनी वरीलप्रमाणे हकीकत सांगुन त्यांनी पोलीस सय्यद व वकील उपाध्ये यांना अँन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार केली असल्याचा संशय आल्यामुळे त्यांनी मागणी केलेले पैसे ते आता स्विकारणार नाहीत अशी खात्री झाली आहे.तरी पुढील कार्यवाही करावी म्हणुन जबाब दिलेला आहे.

त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करून तक्रारदार कारखानीस यांना पोलीस हवालदार अल्ताफ सय्यद व वकील उपाध्ये यांचेविरूध्द फिर्याद देणेकरीता त्यांना कळविले असता, त्यांनी त्यांना भिती वाटत असुन माझी आता पोलीस हवालदार सय्यद व वकील उपाध्ये यांचेविरूध्द तक्रार देणार नाही असे कळविले. आम्ही त्यांना समजावुन सांगितले असता, त्यांनी फिर्याद देण्यास असमर्थता दाखविली.

तरी मुळ तक्रारदार कारखानीस यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात दिलेल्या तक्रारी अर्जामधील गैरअर्जदार यादव यांचेकडून कारखानीस यांना देणेसाठीचे चेक पोलीस हवालदार सय्यद यांनी स्वतःकडे ठेवून घेतल्याचे सांगून, कारखानीस यांना वकील उपाध्ये यांचेशी बोलण्यास सांगिल्याने, कारखानीस यांनी उपाध्ये वकील यांना फोन केला असता, उपाध्ये यांनी पोलीस सय्यद यांचेकडून तक्रारदार कारखानीस यांना चेक घेवून देतो, त्याकरीता पोलीस हवालदार सय्यद यांना तीन लाख रूपये दयावे लागतील, असे म्हणुन तक्रारदार कारखानीस यांचेकडे बेकायदेशिरपणे अप्रामाणिकपणे तीन लाख रूपये लाचेची मागणी केली आहे. वकील उपाध्ये यांनी तक्रारदार कारखानीस यांचेकडे मागणी केलेल्या लाच मागणीस, पोलीस हवालदार सय्यद यांनी बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे प्रोत्साहन दिले आहे, म्हणुन माझी 1) अल्ताफ हारून सय्यद, पो.हे.कॉ.ब.नं. 871, तत्कालीन नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय इचलकरंजी विभाग इचलकरंजी रा. स्मशानभुमी समोर, शहापुर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, 2) पवनकुमार अशोक उपाध्ये, खाजगी वकील, रा. दिपश्रेय, महालक्ष्मी व्हिलेज, साळुंखे मळा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर याचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

MAHESH BHIKAJIRAO CHAVAN(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** MAHESH BHIKAJIRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

ठाणे अंमलदार
इचलकरंजी पोलीस ठाणे



Scanned with CamScanner